रविवार, १ फेब्रुवारी २०१५

तरुण भारत

## दोडामार्ग कॉलेजमध्ये उद्या कॅम्पस इंटरव्ह्यू

**दोडामार्ग :** आयसीआयसीआय बँकेमार्फत २ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात 'कॅम्पस इंटरव्ह्यू' द्वारे बँकेसाठी भरती केली जाणार आहे. महाविद्यालयात प्लेसमेंट सेलमार्फत हा उपक्रम वर्षभर राबविला जातो.गोवा व महाराष्ट्रातील विविध खासगी अस्थापने व कंपन्या यांच्याशी संपर्क साधून त्यांना हवी असलेली नोकरभरती महाविद्यालयात केली जाते. २ फेब्रुवारी रोजी आयसीआयसीआय बँकेचे अधिकारी महाविद्यालयात येणार असून पदवीधर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन नियुक्तीपत्रे दिली जाणार आहेत. पात्र विद्यार्थ्यांना आकर्षक वेतन दिले जाणार आहे. बँकिंग क्षेत्रात करिअर करू इच्छीणाऱ्या या महाविद्यालयाच्या माजी पदवीधर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात सोमवारी उपस्थित राहवे, असे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे.